
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ऐतिहासिक कादंबरी : 'स्वामी' स्वरूप व प्रवृत्ती

डॉ. रीता पाठक
नबीरा महाविद्यालय , काटोल.

## प्रस्तावना :




"स्वातंत्र्योत्तर मराठी ऐतिहासिक कादंबरी 1962पासून म्हणजे रणजित देसाई यांच्या 'स्वामी' कादंबरीपासून सुरू होते असे स्थूलमानाने म्हणता येईल."[1] रणजित देसाई यांच्या अगोदर डॉ. भीमराव कुलकर्णी (हरीनारायण, ओंकार), वसंत वरखेडकर (सत्तावनचा सेनानी) आदींनी ऐतिहासिक कादंबया लिहिलेल्या आहेत. ना. सी. फडके यांनी 'शोनान', 'अस्मान', 'तुफान' या सुभाषबाबूंच्या स्वातंत्र्यचळवळीवर आधारित कादंबऱ्या लिहिल्या आहेत. असे असले, तरी "स्वामीनेच मराठी ऐतिहासिक कादंबरीची एक नवी परंपरा निर्माण केली यात शंका नाही."[2] आजही 'पानिपत', 'संभाजी'पर्यंत ही परंपरा कायम आहे.

ऐतिहासिक कादंबरी केवळ इतिहासावर निवेदन करत नाही. "ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती इतिहास, कल्पना, भावना यांच्या मिश्रणातून येते. सत्याभास, दंतकथा, अद्भुतरम्यता, लोकसमज यांच्या मदतीने कलावंत आपल्या कल्पकतेच्या जोरावर एक नवी सृष्टी निर्माण करीत असतो. "[3] त्यातून ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती होते. स्वातंत्र्यपूर्व ऐतिहासिक कादंबरी कल्पकतेला इतिहासाची जोड देते, तर स्वातंत्र्योत्तर ऐतिहासिक कादंबरी इतिहासाला कल्पकतेची जोड देते. अलीकडचे ऐतिहासिक कादंबरीकार इतिहाससंशोधकाला शोभेल असा अभ्यास करून कादंबऱ्या लिहीत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात ऐतिहासिक कादंबरी चरित्रात्मक स्वरूपात लिहिली गेली आणि तिला वाचकही मोठ्याा प्रमाणात लाभला. "चरित्रात्मक कादंबरी म्हणजे एखाद्या व्यक्तीचे निव्वळ चरित्र नसते किंवा चरित्रनायकाचा अथपासून इतिपर्यंत जीवनपट उलगडून दाखविलेला नसतो. व्यक्तीच्या चरित्रातील घटितांतून त्याचे एक रूप, एक प्रतिमा त्याला गवसलेली असते आणि त्या प्रतिमेचे दर्शन कादंबरीकार घडवीत असतो."[4] त्याला भावलेले नायक–नायिका चित्रित करतो. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील नायक हा इतिहासातील रूढ परंपरेत बसणारा आहे. इ. स. 1920 नंतर हे चित्र बदलले आहे. "इतिहासातल्या रोमांचकारी घटना, समरप्रसंग, हेवेदावे, युद्धे इत्यादीचे प्रस्तुतीकरण करण्यापेक्षा ही नवी ऐतिहासिक कादंबरी या साऱ्या ऐतिहासिक वास्तवातून माणूस शोधण्यात रमू लागली. 'घटनांची संगती लावणे', 'व्यक्तिरेखा जिवंत करणे' आणि 'स्वभावाची संगती लावणे' असे तिहेरी कार्य ती इतिहास आणि कल्पिताच्या आधारे करू लागली."[5] कादंबरीकाराने इतिहास पचवलेला असतो. तो नायकाच्या गुणांच्या चित्रणासोबतच दोषही मांडतो. इतिहासातील सुप्रसिद्ध व्यक्तींना, त्यांच्या दोषांना उदात्ताचे रंग चढविण्याची ही स्वातंत्र्योत्तर ऐतिहासिक व पौराणिक कादंबरीतील एक प्रमुख प्रवृत्ती आहे. लेखक आपल्या आदर्श पुरूषाचे उदात्तीकरण करतो. त्याच्या आत्मप्रतीतीवर विशेष भर देतो.

थोडक्यात, 'स्वामी' कादंबरीने एक नवीन परंपरा निर्माण केली. गो. नी. दांडेकरांचा अपवाद वगळता 1960 नंतरची ऐतिहासिक कादंबरी चरित्रात्मक स्वरूपात लिहिली गेली.

हरिभाऊंचा नायक हा इतिहासातील त्याच्या प्रतिमेला उजळ करतो, तर 1960 नंतर नायकातला माणूस शोधण्याचे कार्य ऐतिहासिक कादंबरीकाराने केलेले आहे.

## स्वामी : रणजित देसाई :

'स्वामी' ही ऐतिहासिक आ ासात्मक विषयावर आधारलेली कादंबरी आहे. पानिपतच्या युद्धानंतर अत्यंत कोवळ्या वयात माधवरावांवर पेशवेपदाची जबाबदारी आली. राघोबादादांमध्ये पेशवेपदासाठी निर्माण झालेली लालसा माधवरावांना कौटुंबिक प्रश्नातून मान वर करू देत नाही. माधवरावांच्या मृत्यूपर्यंत हा संघर्ष कायम चालतो.

## 'स्वामी' कादंबरीचा घाट :

राघोबादादांचा मान ठेवून, प्रसंगी त्यांच्यासोबत संघर्ष करून मराठ्यांची पडत्या काळातील सत्ता माधवरावांनी सांभाळली. शत्रूवर जरब बसवून अखेरपर्यंत दौलतीचे हित बघितले. याचे चित्रण कादंबरीत आलेले आहे.

माधवराव अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे, सहिष्णू वृत्तीचे, ब्राह्मणांना सढळ हाताने दान करणारे होते. रामशास्त्रींनी माधवरावातील क्षत्रियत्व जागे केले. शनिवारवाड्यातील होम–हवन बंद होऊन पुन्हा मसलती, खलबते सुरू झाली. माधवरावांची तडफ बघून सखारामबापू, गंगोबातात्या, आनंदीबाई सर्वच अस्वस्थ होतात. राघोबादादांनाही ते एक संकटच वाटते. राघोबादादा व माधवराव यांच्या डाव–प्रतिडावांत कादंबरीचे कथानक पुढे सरकते. माधवरावांच्या मोहिमा, पराक्रम; काका–काकू इ. म्हाताऱ्यांना 'वाजवण्याची' माधवरावांची पद्धत, अधिकार मिळवण्याची व टिकवण्याची ताकद, निर्णय घेण्याची पद्धत या मराठी मनाला भुरळ घालणाऱ्या गोष्टी 'स्वामी'त आल्या. ह्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल, की 'स्वामी'ची संरचना कौटुंबिक आहे."[6] सामाजिक मराठी कादंबरीप्रमाणे मुलगा, आई, सून ही पात्रे प्रबळ आहेत. त्यांच्या साथीला माधवरावांचे आजारपण, आर्थिक ताण–तणावाची परिस्थिती व आप्त स्वकीयांशीच होणारा संघर्ष माधवरावांसाठी सहानुभूती निर्माण करतो. "माधवरावांच्या असामान्य राजकीय कर्तृत्वाचे चित्रण करीत असतानाच दुसरीकडे त्यांच्या वैयक्तिक जीवनातील अपयश रंगवून त्याला 'ट्रॅजिक हिरो' ठरविण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे."[7] कादंबरीच्या पूर्वार्धात मुख्य पात्र माधवरावांचे असते. रमा कोणत्याही निर्णयात हस्तक्षेप करत नाही. रमाबाईंनी राज्यकारभारात कधीही आपल्या आप्तांसाठी काहीही मागणी केली नाही. "उत्तरार्धात माधवराव दुय्यम बनतात आणि रमाबाईस महत्त्व प्राप्त होते."[8] रमा–माधवरावांचे भावविश्व या कादंबरीत चित्रित केलेले आहे. या दांपत्याच्या प्रेमात लेखक इतका पडतो, की कादंबरीची ऐतिहासिकता हरवल्यासारखी वाटते. "स्वामी'ला ऐतिहासिक वास्तवाचे भव्य क्षितिज नाही, हा नेमाड्यांचा आक्षेप जोरदार आणि चपखल आहे. रणजित देसायांनी पेशव्यांच्या कौटुंबिक तणावावर अप्रमाण भर देऊन कादंबरीला फार घरेलू आणि चिंचोळे केले आहे. त्यामुळे 'स्वामी'ला शोकात्मिकेची उंची लाभत नाही, हेही कबूल करावे लागते; परंतु पेशव्यांच्या घरातील क्षुद्र गृहकलह हे ऐतिहासिक वास्तवच होते आणि माधवरावांवर लिहिणाऱ्या कोणत्याही प्रतिभावंत कादंबरीकाराला ते टाळणे अशक्य गेले असते."[9] ऐतिहासिक कादंबरीत इतिहास आणि कल्पकता यांची सरमिसळ अत्यंत बेमालूमपणे केलेली असते. सत्य व काल्पनिकातील फरक सहज सापडत नाही. सत्याभोवती काल्पनिकतेचे व काल्पनिकतेवर सत्याची पुटे चढवलेली असतात; तरीही ऐतिहासिक कादंबरीत इतिहासाला अधिक महत्त्व असते. "देसायांचे कादंबरीतील ऐतिहासिकता आणि कौटुंबिकता या घटकद्रव्यांचे प्रमाण निश्चितच चुकलेले आहे."[10] व "इतिहासकथेपेक्षा तिचा घाट कुटुंबकथेला जवळचा असल्यामुळे ऐतिहासिक प्रस्तुततेच्या दृष्टीने तिचा कस कमी झाला आहे."[11] याचा विचार निश्चितच करावा लागेल, तरीही रमा–माधवांच्या खासगी जीवनाला कादंबरीची अर्थपूर्ण कक्षा असल्याचे मान्य करावे लागते. "इतिहासकथेपेक्षा कुटुंबकथेचा अधिक रणा असलेल्या 'स्वामी'च्या निर्मितीमागे लेखकाची मूल्यव्यवस्था उभी आहे ती सनातनी, पारंपरिक आणि सरंजामशाही वृत्तीची निदर्शक आहे; हे त्यांनी रमाबाईच्या सती जाण्याचा जो प्रसंग इतक्या उत्कर्षबिंदूपर्यंत नेला आहे; त्यावरून लक्षात येते."[12] त्यामुळेच राजा राममोहन रायांची सतीबंदीची चळवळ रमेला सती जाण्यासाठी अडवत नाही. इतकेच नव्हे तर तिचा श्वेतपदर ज्वालातूनही वर उडवताना दाखवण्याचे त्यांचे धाडस म्हणजे सनातनी वृत्तीचा कळस होय.

## 'स्वामी' कादंबरीतील संघर्ष :

'स्वामी' कादंबरीत माधवराव केंद्रीय भूमिकेत आहेत. पानिपतावरील परा वानंतर वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ते पेशवेपदावर विराजमान झाले. 'स्वामी' कादंबरी पेशवे दरबाराने सुरू झाली असली तरी ती माधवराव व राघोबादादा यांच्या संघर्षाने सुरू झालेली जाणवते. हा काका–पुतण्यांचा संघर्ष कादंबरीच्या अखेरपर्यंत चालू असतो. राघोबादादांना पाहिजे असलेले पेशवेपद, राज्याची वाटणी, त्यांचे दोलायमान वर्तन हे संघर्षाला कारणीभूत ठरतात. राघोबादादांचा अहं, सखारामबापू, गंगोबातात्या व आनंदीबाईंचे वर्तन राघोबादादांना कादंबरीभर स्वतःचे निर्णय घेऊ देत नाहीत. अनेकदा काका–पुतण्यांचा संघर्ष टोकदार होऊन तुटेल असे वाटत असतानाच तो संपतो. अनेक वेळा गोपिकाबाई हा संघर्ष मिटवतात.

शत्रू राज्यावर चाल करून येतो आहे; तेव्हा त्याला थोपवणे महत्त्वाचे; पण त्याचा कायमचा निःपात करावयाचा नाही. आपला विजय डोळ्यांसमोर असतानाही तह करावयाचा व एक प्रकारे शत्रूवर उपकार करावयाचे. काका–पुतण्यांच्या संघर्षामध्ये पुन्हा उपकाराची परतफेड करून घ्यावयाची. घरातील संघर्षात शत्रूला निमंत्रण व पुन्हा विजयानंतर बिदागीच्या स्वरूपात मुलूख तोडून दयावयाचा. हा आपल्या हाताने आपल्याच पायावर दगड पाडून घेणारा संघर्ष आहे.

'स्वामी' संघर्षाने रलेली कादंबरी आहे. या कादंबरीत काका–पुतण्या, मामा– भाचा, आई–मुलगा, सासरा–जावई, पेशवा–सरदार यांचे टोकदार संघर्ष आहेत. या संघर्षांमुळे आतड्या–कातड्याची, रक्ताची नाती तुटतात. आईने मुलाच्या अंत्यविधीलाही येऊ नये इतका कडवटपणा या संघर्षात आहे. मरणादारी पुतण्या असताना काका राजकारण करून चौक्या पहारे तोडून पसार होतात. ज्या काकांमुळे पेशवेपद मिळाले, त्यांनीच मारेकरी घालावा हे संघर्षाचे अंतिम टोक आहे.

## रमा–माधव :

'स्वामी' कादंबरी ज्या थरांनी बनलेली आहे, त्यांतील रमा आणि माधवरावांच्या भावविश्वाचा थर अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांची मने एकमेकांसाठी हळवी आहेत. अगदी माधवराव रात्री शयनगृहात आल्यानंतर रमेची झोपमोड होणार नाही, याची काळजी घेतात. रमा ही सदैव पतिदर्शनाला आतुर झालेली असते. "इतिहासाला ज्ञात नसलेले रमा–माधवांचे नाजूक, कोमल भावबंध रणजित देसाई यांनी त्यांना जाणवलेल्या रोमँटिक वृत्तीतून प्रकट केले. रमा–माधवांचे हे रूप इतिहासाशी फटकून वागणारेच आहे. ती देसायांची नवनिर्मिती आहे."[13]

माधवरावांचा संघर्ष कधीही रमेसोबत होत नाही. तसेच माधवरावांच्या कौटुंबिक संघर्षात रमा कधीही प्रतिक्रिया देत नाही. गोपिकाबाईंचा शनिवारवाडा सोडण्याचा प्रसंग, माधवरावांनी पटवर्धनांकडून काढून घेतलेले अधिकार, राघोबादादांनी माधवरावांवर घातलेला मारेकरी हे प्रसंग या संबंधाने बोलके आहेत. अशा प्रसंगीही ती संयम पाळते. "ती समजदार आहे, प्रेमळ आहे, सहनशील आहे आणि त्यागीही आहे."[14] वास्तविक ती पेशव्यांची पत्नी असल्यामुळे पेशव्यांकडून काही खासगी बाबी सहज करवून घेऊ शकली असती. याउलट ती माधवरावांच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करताना दिसते.

## निष्कर्ष :

"स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ऐतिहासिक कादंबरी : 'स्वामी' स्वरूप व प्रवृत्ती" या प्रकरणात हाती आलेले निष्कर्ष खलीलप्रमाणे आहेत.

1) स्वातंत्र्योत्तर मराठी ऐतिहासिक कादंबरी राष्ट्रभक्ती, शिवाजी महाराजांवरील प्रेम, भूतकाळातील शौर्य जागृत करणे, अंधानुकरणापासून समाजाला परावृत्त करणे, वीरवृत्तीचा भाव जागृत करणे, समकालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीला उत्तर शोधणे या प्रेरणेतून लिहिलेली आहे.

2) स्वातंत्र्योत्तर मराठी ऐतिहासिक कादंबरी बहुंशी चरित्रात्मक स्वरूपाची आहे. उदा.
स्वामी, श्रीमान योगी, संभाजी आदी.

3) स्वातंत्र्योत्तर मराठी ऐतिहासिक कादंबरी इतिहास, कल्पना, भावना यांच्या मिश्रणातून निर्माण झालेली आहे.

4) स्वातंत्र्योत्तर मराठी ऐतिहासिक कादंबरीची 'स्वामी'ने एक नवीन परंपरा सुरू केली आहे. 'स्वामी'ला मिळालेले यश ऐतिहासिक कादंबरीकारांना प्रेरक ठरलेले आहे.

## संदर्भग्रंथ सूची :–

१. बापट प्र. वा., गोडबोले ना. वा., 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', व्हीनस, पुणे, प्रथमावृत्ती, 1973 पृ. क्र. 167
२. डॉ. कुलकर्णी द. भि., 'स्वामी व स्वामीची लोकप्रियता', सत्यकथा, भागवत विष्णु पुरूषोत्तम (संपा.), ऑगस्ट 1970, पृ. क्र. 35–36
३. सप्रे आविनाश, स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी, 'प्रदक्षिणा', खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल, पुणे, प्रथमावृत्ती, 1991, पुनर्मुद्रण 2000 पृ. क्र. 191.
४. तत्रैव, पृ. क्र. 191
५. तत्रैव, पृ. क्र. 191
६. देसाई स. श., 'इतिहास आणि ऐतिहासिक साहित्यकृती', 'ललित', सरवटे वसंत (संपा.) दिवाळी अंक, 1974, पृ. क्र. 79
७. तत्रैव, पृ. क्र. 79.
८. जाधव रा. ग., 'निवडक समीक्षा', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प्रथमावृत्ती, 2006, पृ. क्र.242
९. सप्रे आविनाश, उपरोक्त, पृ. क्र. 191, 192
१०. कवठेकर बाळकृष्ण, पलायनवादी ऐतिहासिक साहित्यकृती, 'वाङ्मयीन चर्चा व चिकित्सा', सौ. जवळकर, प्रथमावृत्ती, 1978, पृ. क्र. 40
११. डॉ. वडेर प्रल्हाद, 'स्वातंत्र्योत्तर मराठी ऐतिहासिक कादंबरी', 'मराठीतील ऐतिहासिक साहित्यकृती', गोमंतक मराठी अकादमी, पणजी, प्रथमावृत्ती, 1990, पृ. क्र. 91
१२. तत्रैव, पृ. क्र. 97

१३. डॉ. फडके भालचंद्र, 1971 सालातील कादंबरी, 'ललित', कोठावळे केशव (संपा.), एप्रिल 1972, पृ. क्र. 27
१४. सप्रे आविनाश, उपरोक्त, पृ. क्र. 191